सहवेदना

रघुनाथ पाटील

निमणी : येथील रघुनाथ दतू पाटील (वय ६८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माती सावरणेचा विधी शुक्रवारी २३ फेब्रुवारी रोजी सकाळी निमणी येथे आहे.

अशोक माने

सांगली : अशोक भुपाल माने (वय ७४ रा. पत्रकार नगर, सांगली) यांचे निधन झाले. ते बीएसएनएल माजी कर्मचारी होत. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, बहीण, भाऊ, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन शनिवारी २४ फेब्रुवारी रोजी आहे.

सौ. सिंधूताई माने

सांगली : सौ सिंधुताई बाबासाहेब माने वय ७० यांचे गुरुवारी निधन झाले त्या सांगलीतील माने चौकातील प्रवीण माने व विवेक माने यांच्या मातोश्री होत्या त्यांच्या पाठीमागे पती दोन मुले सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे रक्षाविसर्जन शुक्रवार दिनांक २३/२/२०२४ सांगली येथे सकाळी १० वा अमरधाम स्मशानभूमीत होणार आहे.

जि.प. शाळेचा गिलावा पडला

कवठेएकंदमधील घटना : प्रसंगावधानतेमुळे अनर्थ टळला

प्रतिनिधी
तासगाव

कवठेएकंद येथील एका जिल्हा परिषद शाळेच्या नवीन बांधलेल्या वर्ग खोलीतील छताचा गिलावा पडला. ही घटना मंगळवारी दुपारी १२ च्या दरम्यान ही घटना घडली. यामध्ये शिक्षकांच्या प्रसंगावधानातेमुळे कुणालाही दुखापत झाली नाही.

शैक्षणिक गुणवत्ता, चागंली पटसंख्या, सोयीसुविधा आधारे मॉडेल स्कूल टप्पा क्र. २ मध्ये या जि. प. शाळेची निवड झाली आहे. मॉडेल स्कूल अंतर्गत नव्याने तीन वर्ग खोल्या बांधकाम व रंगरंगोटी काम पूर्ण झाले आहे.

मंगळवार रोजी एका वर्ग खोलीच्या छताचा गिलावा अचानकपणे खाली कोसळला. या घटनेपूर्वीच वर्गशिक्षिका, मुख्याध्यापक व सहाय्यक शिक्षक यांनी गिलावा चिरल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांना त्या वर्गखालीतून बाजूला बसायला सांगितले होते. त्यामुळे गिलावा कोसळला, त्यावेळी विद्यार्थी वर्गात नव्हते. शिक्षकांच्या प्रसंगावधानतेमुळे विद्यार्थ्यांना कोणतीही दुखापत इजा झाली नाही. मात्र शिक्षकांसाठी असलेल्या खुर्चीचे मात्र तुकडे झाले होते.

या घटनेनंतर पंचायत समिती बांधकाम अभियंता, सरपंच, ग्रामसेवक यांनी भेट देऊन पाहणी केली. तर शाळा व्यवस्थापन समितीची तात्काळ बैठक घेऊन सदर बांधकामाचे फेरनिरीक्षण करावी. निकृष्ट दर्जाच्या कामास जबाबदार असणाऱ्या अधिकारी व ठेकेदारावर कारवाई करावी, असा ठराव करण्यात आला आहे.

गौणखनिज वाहतूकीवेळी नियमांची पायमल्ली

देवराष्ट्रे : कडेगाव तालुक्यात गौणखनिज उत्खनन व वाहतूक करताना शासकीय निर्देशांकडे दुर्लक्ष करून त्यांची वाहतूक सुरू आहे. शासकीय नियमानुसार गौणखनिज वाहतूक करताना ताडपत्री वा अन्य साधनाने झाकून वाहतूक करावयाची आहे. परंतु गौणखनिज वाहतूक होत असताना यावर काहीच न झाकता वाहतूक होत आहे. यामुळे अनेक वेळा मुरूम, माती रस्त्यावर पडून अपघात होत आहेत. तर मुरूम मातीच्या धुळीमुळे इतर प्रवाशांनाही वाहन चालवताना त्रास होत आहे. तालुका प्रशासनाचे मात्र, याकडे दुर्लक्ष आहे. राज्यमार्गाच्या कामासाठीही मुरूम वाहतूक होत आहे. मात्र, ती झाकून न नेता उघड्यावर नेली जात आहे. त्याचा त्रास प्रवाशांना होत आहे.

लैंगिक अत्याचारप्रकरणी एकावर गुन्हा

संशयीत रत्नागिरी तालुक्यातील : विश्रामबाग पोलिसांत फिर्याद

प्रतिनिधी
सांगली

लग्नाचे आमिष दाखवून गेली १५ वर्षे लैंगिक अत्याचार केल्याबद्दल सांगलीतील एका लेडीज पार्लर चालक महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. याप्रकरणी संशयित शिवाजी आनंदराव चव्हाण (रा. फणसूफाटा, आनंद निवास, रत्नागिरी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पीडित महिलेचा लेडीज पार्लरचा व्यवसाय आहे. विश्रामबाग पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या महिलेची आणि संशयित शिवाजी चव्हाण याची २००८ मध्ये ओळख झाली. ओळखीनंतर चव्हाण याने पीडित महिलेला लग्नाचे आमिष दाखवले. तुझ्याशी लग्न करतो असे सांगून वेळोवेळी त्याने पीडितेशी इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध ठेवले. तसेच शिवीगाळ व मारहाण देखील केली. गेली १५ वर्षे वारंवार विचारणा करूनही त्याने पीडितेशी लग्न केले नाही, त्यामुळे तिने विश्रामबाग पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. त्यानुसार चव्हाण याच्याविरुद्ध लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आधार हाऊसिंग फायनान्स लि., Aadhar Housing Finance Ltd

कॉर्पोरेट कार्यालय : युनिट क्र. ८०२, नटराज रुस्तोमजी, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे व एम. व्ही. रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००६९
सांगली शाखा : सीटीएस -६३९/६३९/१, शॉप नं. १०६, पहिला मजला, सिद्धीविनायक लँडमार्क, पुष्पराज चौक, डीसीसी बँक जवळ, सांगली ४१६४१६, महाराष्ट्र.

मागणी सूचना

दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या नियम १३(२) आणि दि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या नियम ३ (१) सह वाचण्यात आलेल्या नियमान्वये.

दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सदर कायदा) अंतर्गत निम्नस्वाक्षरीकार हे आधार हाऊसिंग फायनान्स लि., (एचएफएल) चे अधिकृत अधिकारी आहेत. सदर कायद्याच्या अनुच्छेद १३(१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचण्यात आलेल्या कलमानुसार प्राप्त अधिकारांचा वापर करीत अधिकृत अधिकाऱ्यांनी सदर कायद्याच्या अनुच्छेद १३(२) अंतर्गत एक मागणी सूचना निर्गमित केली, ज्यात खालील कर्जदारांना (सदर ''कर्जदारांना'') त्याना पाठविलेल्या मागणी सूचनेत जी खाली देण्यात आलेली आहे, नमूद रकमेची परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते. वरील संदर्भात याद्वारे पुन्हा एकदा सूचना देण्यात येते की, सदर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ६० दिवसांचे आत सदर कर्जदारांनी एचएफएलकडे खाली नमूद रकमेचा भरणा सदर मागणी सूचनेत दिलेल्या तपशिलाप्रमाणे व्याजासह एकत्रितरित्या रकमेच्या भरणा करण्याच्या तारखेपर्यंत/किंवा वटेपर्यंत कर्ज दस्तऐवजात नमूद तसेच इतर कागदपत्र/लेखी स्वरुपात देण्यात आलेल्या कागदपत्रासह वाचण्यात आलेल्या कर्ज करारानुसार जो कर्जदाराने स्वाक्षरीबद्ध केला आहे, भरणा करावा. कर्जाच्या परतफेडीसाठी सुरक्षा म्हणून खालील मालमत्ता कर्जदाराने एएचएफएलकडे गहाणवट ठेवली आहे.

अ. क्र.	कर्जदार / सहकर्जदार व जामिनदार यांचे नाव	मागणी सूचना तारीख आणि रक्कम	सुरक्षित मालमत्तेचे वर्णन (स्थावर मालमत्ता)
१	(कर्ज कोड क्रमांक १५११०००००८०/सांगली शाखा) शहाजी संभाजीराव पाटील (कर्जदार) सारिका शहाजी पाटील (सह-कर्जदार)	१२-०२-२०२४ रु. १०,६४,५९८/-	पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, एम नं. १६४१, सिद्धेवाडी रोड रा. खंडेराजुरी, प्लॉट नं. ४३, खंडेराजुरी, सांगली, महाराष्ट्र ४१६४०७.

जर सदर कर्जदार एएचएफएल यांच्याकडे उपरोक्त नमूद केल्यानुसार भरणा करु न शकल्यास नियमांच्या अंतर्गत कलम १३(४) अनुसार वरील सुरक्षित मालमत्तेच्या संदर्भात कारवाई करण्यात येईल जी सर्वस्वी कर्जदारांच्या खर्च आणि परिणामाच्या आधीन असेल. कायद्यांच्या अंतर्गत उपरोक्त नमूद मालमत्तेची विक्री, भाडेतत्व किंवा अन्य कोणत्याही प्रकारे एएचएफएलच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरीत करण्यास नमूद कायद्याच्या अंतर्गत प्रतिबंधित करण्यात आले आहे. नमूद कायदा आणि नमूद नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कोणीही व्यक्ती कायद्याच्या अंतर्गत तुरुंगवास आणि/किंवा दंडात्मक कारवाईस पात्र असेल.

स्थळ : महाराष्ट्र दिनांक : २३.०२.२०२४
सही/- अधिकृत अधिकारी
आधार हाऊसिंग फायनान्स लि. करिता

शेतकऱ्यांचा विरोध डावलून वृक्षतोड

वार्ताहर
देवराष्ट्रे

कुंभारगाव ता. कडेगाव येथे रस्ता रुंदीकरणासाठी शेतकऱ्याचा विरोध डावलून आंब्याची झाडे तोडण्यात आली. विशेष म्हणजे ह्या रस्ताचे रुंदीकरण करताना जमिनमालकास कोणत्याही नुकसान भरपाईची तरतूद नाही. शेतकऱ्यांचा विरोध असतानाही झाडांची कत्तल केल्याने संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

जिल्ह्यातील चार तालुक्यांना जोडणारा पुसेसावळी ते वाकूर्डे बुद्रुक या राज्यमार्गाचे काम सध्या सुरू आहे. त्यासाठी जवळपास सहाशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हा रस्ता पूर्णपणे सिमेंट कॉंक्रीटचा असणार आहे. पुसेसावळी पासून सुरु होणारा हा राज्यमार्ग वांगी, अंबक, देवराष्ट्रे, कुंभारगाव, कुंडल किर्लोस्करवाडी, बुर्ली, आमणापूर संतगाव, अंकलखोप, नागठाणे फाटा, वाळवा, नवेखेड, बोरगाव, फार्णेवाडी, धनगरवाडी, येवलेवाडी, कासेगाव, शेणे, वाटेगाव, टाकवे, वाकुर्डे असा जात आहे. सध्या हे काम अंबक ते कुंडल दरम्यान सुरु आहे. रुंदीकरणादरम्यान राहती घरे, शेती, अन्य मालमत्तेचे नुकसान होत आहे. मात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाईची तरतूद नाही. त्यामुळे राज्यमार्गाच्या कामाला विरोध होत आहे. देवराष्ट्रे येथेही ग्रामस्थांचा विरोध झाल्याने रस्ताकाम बंद झाले. कुंभारगाव येथे शेतकऱ्याने विरोध केल्यानंतरही आंब्याची ५० झाडे तोडण्यात आली. बहरलेली आंब्याची झाडे तोडल्याने शेतकरी संतप्त आहेत.

रविवारी लोकअदालत

सांगली : जिल्हा न्यायालय सांगली, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, सहकार न्यायालय १, २ व सांगली जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये रविवार तीन मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पक्षकारांनी जास्तीत जास्त प्रकरणे ठेवून तडजोडीने मिटविण्याबाबत लाभ घ्यावा, असे

या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.३२६६ /सन २०२४ सोबत जोडलेले परिशिष्ट १

निमणी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. निमणी, ता. तासगाव, जि. सांगली

जा.क्र. : ७५० दिनांक :- २२/०२/२०२४

निमणी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि., निमणी. ता. तासगाव जि. सांगली या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सूचित करण्यात येते कि, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील २ या सर्वसाधारण कर्जदार प्रवर्गातील/मतदारसंघातील संचालक/संचालकाच्या निवडीकरिता अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक :- ०७/०३/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता निमणी या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. सभेत नैमितिकपणे रिक्त झालेली पदे निवडीसाठी खालील निवडणूक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

निवडणूक कार्यक्रम

अ.क्र	तपशिल	वेळ
१	नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकृती	सकाळी ११.३० ते दुपारी १२.००
२	नामनिर्देशन पत्र छाननी	दुपारी १२.०० ते दुपारी १२.३०
३	वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिद्धी	दुपारी १.००
४	नामनिर्देशन पत्र माघार	दुपारी १.०० ते दुपारी १.३०
५	अंतिम उमेदवाराची यादी जाहीर करणे	दुपारी १.३०
६	मतदान प्रक्रिया	दुपारी १.३० ते दुपारी २.००
७	मतमोजणी प्रक्रिया	दुपारी २.०० ते दुपारी २.३०
८	निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांबाबत निकाल घोषित करणे.	दुपारी ३.००

टीप :- निवडणूक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.

(मा. अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने) स्वाक्षरी
दिनांक :- २२/०२/२०२४ सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी/
ठिकाण :- निमणी व्यवस्थापकीय संचालक
निमणी विविध कार्यकारी सहकारी सोसा. लि. निमणी, ता.तासगाव, जि. सांगली

जत नगरपरिषद, जत, जि.सांगली

फोन - (०२३४४)२४६०२० Email- npjath121@gmail.com

जाहीर फेर ई-निविदा सूचना क्र.०४
सन २०२३-२०२४

मुख्याधिकारी तथा प्रशासक, जत नगरपरिषद जत यांचेकडून महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२३-२४ योजनेअंतर्गत खालील नमूद कामांसाठी फेर ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदेबाबत सविस्तर माहिती https://mahatenders.gov.in/ या संकेत स्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे.

निविदा प्रसिद्धी दिनांक : २३/०२/२०२४ सकाळी १०:०० वाजता
निविदा स्वीकृती अंतिम दिनांक :- ०१/०३/२०२४ दुपारी ४:०० वाजेपर्यंत

अ. क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम	प्रारंभिक सुरक्षा अनामत (१%)	काम पूर्ण करणेची मुदत	निविदा डाऊनलोड करणेची फी. रु.	ठेकेदाराचा वर्ग
५	प्रभाग क्र.०५ मधील डॉ. विजय पाटील घर ते नामदेव साळेघरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	११७४६१९/-	११७४७/-	३ महिने	१५००/-	CLASS VI & ABOVE
१०	प्रभाग क्र.०९ मधील डोळ्ळी गल्ली येथे ट्रीमिक्स रस्ता करणे	४५८१९०/-	४५८२/-	३ महिने	१०००/-	CLASS VIII & ABOVE
११	प्रभाग क्र. ०९ मधील राम मंदिर ते बंकेश्वर मंदिर पर्यंत ट्रीमिक्स रस्ता करणे	४८१७८२/-	४८१८/-	३ महिने	१०००/-	CLASS VIII & ABOVE
१३	प्रभाग क्र.१० मधील मोडी घर ते गणपती मंदिर पर्यंत आर.सी.सी. गटर करणे	१४२२७११/-	१४२२७/-	३ महिने	१५००/-	CLASS VI & ABOVE

सही/- श्री. अशोक कुंभार
मुख्याधिकारी तथा प्रशासक, जत नगरपरिषद, जत

थोरबोलेंचे दुसऱ्या दिवशीही उपोषण

इस्लामपूर : तहसील कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते संग्राम थोरबोले हे कंत्राटी कामगारांच्या प्रश्नी उपोषणाला बसले आहेत.

प्रतिनिधी
इस्लामपूर

महावितरणच्या भोंगळ कारभाराला आळा घालण्यासाठी व महावितरण कंत्राटी कामगारांच्या आर्थिक शोषणाविरोधात सामाजिक कार्यकर्ते संग्राम थोरबोले हे तहसील कार्यालयासमोर ते उपोषणास बसले आहेत.

महावितरणच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी उपोषणास पाठिंबा दिला असून त्याचे निवेदन महावितरण कंत्राटी कामगार संघ व महावितरण संघर्ष समितीचे अभ्यासक श्रीदास होनमाने व प्रमोद पाटील आणि महावितरण संघर्ष समितीच्यावतीने कार्यकारी अभियंता चंद्रकांत डामसे यांना दिले.

यावेळी विभागातील सर्व कंत्राटी कर्मचारी थोरबोले यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहीतील, अशी ग्वाही श्रीदास होनमाने यांनी दिली. कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पगारात कमिशन घेऊ नये, असाही मुद्दा उपस्थित करून त्याच्यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करीन, असे आंदोलनकर्ते थोरबोले यांनी सांगितले. शेतीपंपाच्या रीडिंगची बिले अदा केलेल्या कंत्राटदारांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. शाखा अभियंता दाभोळे व मुल्ला यांची खातेनिहाय चौकशी करुन कायदेशीर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. दुसऱ्या दिवशी उपोषणाला कर्मचाऱ्यांनी पाठिंबा दिला.

MAHAVITARAN Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

ई-निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कंपनीच्या संचलन व सुव्यवस्था विभाग, इस्लामपूर कार्यालया अंतर्गत सन २०२४-२५ करिता परवानाधारक मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदारांकडून खालील प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	निविदा क्र.	निविदा तपशिल	निविदा शुल्क
१	EE/ISL/T-०१/२०२४-२५	Hiiring of vehicle for Islampur-१ Sub-Division, (for three years)	११,४८,४००/-
२	EE/ISL/T-०२/२०२४-२५	Hiiring of vehicle for Islampur-२ Sub-Division, (for three years)	११,४८,४००/-

वरील निविदा ई-निविदा पध्दतीनेच भरता येतील, संकेत स्थळावरुन निविदा भरण्याची अंतिम मुदत दिनांक २९.०२.२०२४ रोजी २३.५९ वा. पर्यंत राहिल. वरील निविदा दि. ०१.०३.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येतील. अधिक माहिती व निविदा https://etender.mahadiscom.in या संकेतस्थळावर दि. २२.०२.२०२४ ते २८.०२.२०२४ रोजी २३.५९ पर्यंत उपलब्ध आहेत. वरील सर्व निविदा अथवा एखादी निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार खाली सही करणाऱ्यांनी राखून ठेवला आहे.

PRO No. KOPZ/PRO/२३९/२०२३-२४
कार्यकारी अभियंता (संवसु)
विभागीय कार्यालय, इस्लामपूर

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १०१ अन्वये
जाहीर समन्स

विटा येथील मे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था खानापुर ता. विटा यांचे कोर्टात...
ज्ञानदीप को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. मुंबई विटा शाखा. पत्ता : सुदर्शन चेंबर्स, भैरवनाथ चित्रमंदिरसमोर, लेंगरे रोड, विटा. ता. खानापुर जि. सांगली --- अर्जदार
विरूध्द

अ. क्र.	जाबदाराचे नांव	जाबदार क्र.	जाबदार पत्ता	दावा क्र.	दावा रक्कम
१	श्री. विठ्ठल सोपान चव्हाण	३	महिंद्रा अपार्टमेंट, प्लॉट नं. ७, क्रांती क्लिनिक पाठीमागे, विद्यानगर, सांगली.	७५/२०२३-२४	११९८३०७/-
२	श्री. रमाकांत उत्तम रसाळ	२	मु.पो. विटा जुना वासुंबे रोड, हजारे मळा, ता.खानापूर, जि.सांगली	७६/२०२३-२४	१५१३४०/-
३	श्री. सचिन दादा कुंभार	२	मु.पो.नेवरी, (संभाजीनगर) ता. कडेगाव.जि. सांगली	७६/२०२३-२४	१५१३४०/-
४	श्रीमती सज्जला तुषार मोरे	३	मु.पो. विटा आदर्श कॉलेज पाठीमागे, मायणी रोड, ता. खानापूर जि.सांगली	७७/२०२३-२४	५५५०५/-

वरील जाबदार यांना सदर दावा दाखल झालेनंतर नेमलेल्या सुनावणी तारखेस उपस्थित राहून म्हणणे मांडणे कामी रजिस्टर पोष्टाव्दारे नोटीस पाठवुनही लागु झालेली नाही. सबब या नोटीसव्दारे वरील जाबदार यांना कळविणेत येते की, सदर दाव्या संबंधी लेखी व तोंडी म्हणणे मांडणेसाठी दिनांक ११/०३/२०२४ रोजी दुपारी ०३:०० वाजता सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, खानापुर ता. विटा (मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय विटा) जि. सांगली येथे ही सुनावणी तारीख नेमलेली आहे. सदर तारखेस हजर न राहीलेस तुमचे गैरहजेरीत चौकशी करुन निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी.

स्थळ - विटा. दिनांक - २१/०२/२०२४.
(शिक्का)
सही/- सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था खानापुर, ता. विटा

शिराळ्यात 'संजय गांधी' ची प्रभावी अंमलबजावणी

प्रतिनिधी
शिराळा

संजय गांधी निराधार योजने अंतर्गत असणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी प्रशासनाच्या सहकार्याने प्रभावीपणे सुरु असुन शिराळा तालुक्यातील प्रत्येक गावातुन येणाऱ्या प्रस्तावात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. संजय गांधी योजनेला नवसंजीवनी मिळाली असल्याची माहिती संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष केदार नलावडे यांनी दिली

यावेळी सदस्य विजय गराडे पाटील उपस्थित होते. केदार नलावडे म्हणाले, डोंगरी शिराळा तालुक्यातील महिला माता-भगिनी, जेष्ठ नागरिक, दिव्यांग, दुर्धर आजारग्रस्त रूग्ण, द्रारिद्रेषेखाली कुटुंबातील व्यक्तीसाठी प्रशासकिय पातळीवरील विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे केली आहे. गट-तट, जातपात, राजकारण बाजूला ठेवून जनसेवक म्हणून सर्व सदस्यांना सोबत घेऊन निस्वार्थीपणे काम सुरू आहे. याला महसूल, आरोग्य, ग्रामपंचायत, संजय गांधी विभागातील अधिकारी कर्मचारी लाभार्थ्यांना सुलभतेने कागदपत्रे उपलब्ध करुन देत आहेत. संजय गांधी योजनेतील विविध योजना श्रावणबाळ योजनांची माहिती, त्यात झालेले बदल सांगण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी केली आहे. त्यामुळे दुप्पट वेगाने प्रस्ताव दाखल होत आहेत. शिराळा तालुक्यातील डोंगरी तालुक्यातील महिलांना पेन्शन मिळवून देण्यासाठी अविरतपणे कार्यरत रहाणार असल्याचे सांगितले.

जा.क्रक्ष-/ क्र. १०१ सु.नो./सन २०२४
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, तालुका खानापूर, विटा यांचे कार्यालय, विटा

जाहीर समन्स नोटीस
मे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, विटा, तालुका खानापूर यांचे कोर्टात
(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा अधिनियम १९६० चे कलम १०१)
जीवनधारा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., खेराडे वांगी, शाखा- विटा - अर्जदार
विरुद्ध
जाबदार

अ.नं.	नाव	प्रकार	पत्ता	दावा क्रमांक	रक्कम
१	हजिमलंग रज्जाक मुल्ला	कर्जदार	खंबाळे, औंध	१२२/२०२४	३५,७३४/-
२	विनोद विश्वास जाधव	जामीनदार	आळसंद	१२२/२०२४	३५,७३४/-
३	अजित दिलीप चोथे	जामीनदार	विटा	१२२/२०२४	३५.७३४/-
१	अजित दिलीप चोथे	कर्जदार	विटा	१२३/२०२४	१,०३,१७९/-
२	राहुल दिलीप चोथे	जामीनदार	विटा	१२३/२०२४	१,०३,१७९/-
३	हजिमलंग रज्जाक मुल्ला	जामीनदार	खंबाळे, औंध	१२३/२०२४	१.०३.१७९/-
१	राहुल दिलीप चोथे	कर्जदार	विटा	१२४/२०२४	१,०१,९१३/-
२	औंदुबर उत्तम तारळेकर	जामीनदार	विटा	१२४/२०२४	१,०१,९१३/-
३	अजित दिलीप चोथे	जामीनदार	विटा	१२४/२०२४	१,०१,९१३/-

वरील सर्व जाबदेणार यांना नोटीस देणेत येते की जीवनधारा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., खेराडे वांगी, शाखा- विटा यांनी दि. ०१/०२/२०२४ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र अधिनियम १९६० सि कलम १०१ प्रमाणे वसुली दाखला मिळणेबाबत रीतसर अर्ज या कार्यालयाकडे केला आहे. या कार्यालयाने सदर प्रकरणी दि. २०/०२/२०२४ रोजी सुनावणी ठेवली होती. सदर वरील सर्वांना सुनावणी नोटीस रजिस्टर पोस्टाने पाठवली होती. सदर नोटीस या कार्यालयाकडे आपण पत्ता सोडून गेल्याने परत आली आहे. त्याअर्थी या जाहीर नोटिसीद्वारे आपणांस कळविणेत येते की, अर्जाची सुनावणी दिनांक १५/०३/२०२४ रोजी दुपारी ११ वा.या कार्यालयात ठेवली आहे. मदर तारखेस तुम्ही गैरहजर राहिलेस तुमच्या गैरहजेरीन अर्जाची चौकशी करणेन येईल व आपले काही म्हणणे नाही असे समजून निकाल दिला जाईल, ही नोटीस आज दि.२२/०२/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्यानिशी दिली आहे.

(शिक्का)
सही/- सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, तालुका खानापूर, विटा

दि उगार शुगर वर्क्स लिमिटेड
(सिन क्र. : L15421PN1939 PLC006738)
नोंदणीकृत कार्यालय - महावीर नगर (वखारभाग) सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र)
फोन : (०२३३)-२६२३७१७ | वेबसाईट : www.ugarsugar.com | ई-मेल : usw.sangli@ugarsugar.com

सभासदांना पोस्टल बॅलेटसंदर्भात सूचना

याव्दारे सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ (अधिनियम) च्या कलम ११० च्या तरतुदीनुसार, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) निवम, २०१४ (नियम) मधील नियम २२ आणि २० सह वाचले गेले आहेत. त्यातील कोणत्याही सुधारणा (चे) समावेश, सर्वसाधारण सभेवरील सचिवीय मानके, सेबीचे नियमन ४४ (सूचीबध्द दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५, जसे सुधारीत (लिस्टींग) रेग्युलेशन), कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने विहित केलेली मार्गदर्शक तत्वे (द MCA) वेळोवेळी जारी केलेली सामान्य परिपत्रके (MCA परिपत्रके) आणि इतर कोणतेही लागू कायदे आणि नियमांद्वारे, The Ugar Sugar Works Limited (कंपनी) च्या सदस्यांची खालील बाबींसाठी मंजूरी मिळविण्यासाठी विशेष ठराव म्हणून रिमोट इलेक्ट्रॉनिक मतदान (ई-व्होटिंग) प्रक्रियेद्वारे पोस्टल बॅलेटद्वारे येथे नमूद केल्याप्रमाणे व्यवसाय :-

१. आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी गैर-कार्यकारी आणि स्वतंत्र संचालकांना कमिशनचे पेमेंट.
२. श्री.सोहन एस.शिरगांवकर (DIN.00217631) यांची कंपनीचे कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती.

एमसीए परिपत्रकांच्या संदर्भात, कंपनीने १६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत शेअर्स धारण केलेल्या कंपनीच्या सदस्यांना (कट-ऑफ तारीख) २२ फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांच्या स्पष्टीकरणात्मक विधानासह पोस्टल बॅलेट नोटीस ई-मेल केली आहे. डिपॉझिटरी पार्टीसिपंट/ डिपॉझिटरीज / रजिस्टार आणि कंपनीचे शेअर ट्रान्सफर एजंट यांच्याकडे त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत आहेत. बिगरशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड. कट-ऑफ तारखेनुसार सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत इक्विटी शेअर्सच्या पेड-अप मूल्यावर मतदान हक्क मोजले जातील. कट-ऑफ तारखेनुसार सदस्य नसलेली व्यक्ती केवळ माहितीच्या उद्देशाने नोटीस हाताळेल.

MCA च्या परिपत्रकानुसार, पोस्टल बॅलेट फॉर्मसह पोस्टल बॅलेट नोटिसची हार्ड कॉपी आणि प्री-पेड व्यावसायिक उत्तर लिफाफा सदस्यांना पाठविला जाणार नाही. सदस्यांच्या संमती किंवा असहमतीचा संवाद केवळ ई-मतदान प्रणालीद्वारे होईल.

१६-०२-२०२४ च्या कट-ऑफ तारखेनुसार एकतर भौतिक स्वरूपात किंवा अभौतिक स्वरूपात शेअर्स करणाऱ्या कंपनीच्या सदस्यांना रिमोट इलेक्ट्रॉनिक व्होटिंग (ई-व्होटिंग) प्रक्रियेद्वारे पोस्टल बॅलेटद्वारे त्यांचे मत वापरण्याचा पर्याय आहे. कंपनी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (NSDL) व्दारे प्रदान केलेल्या ई-व्होटिंग प्लॅटफॉमद्वारे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सदस्यांना सुविधा प्रदान करत आहे. रिमोट इलेक्ट्रॉनिक व्होटिंग (ई-व्होटिंग) प्रक्रियेद्वारे पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करण्याचा कालावधी २४-०२-२०२४ (१०.00 AM IST) रोजी सुरू होईल आणि २४-०३-२०२४ (०५.00 PM IST) रोजी समाप्त होईल, त्यानंतर ई-व्होटिंग NSDL द्वारे बंद करण्यात येईल. एखाद्या सदस्याने एकदा मत दिले की, त्याला नंतर ते बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. ई-मतदानासाठी तपशीलवार प्रक्रिया / सूचना पोस्टल बॅलेट नोटिसमध्ये समाविष्ट आहेत.

पोस्टल बॅलेट नोटीस कंपनीच्या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहे, म्हणजे www.ugarsugar.com, स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईटवर जिथे कंपनीचे शेअर्स सूचीबध्द आहेत, म्हणजे www.bseindia.com आणि www.nseindia.com आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (NSDL) ची वेबसाईट म्हणजे www.evoting.nsdl.com.

सदर पोस्टल बॅलेट प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यासाठी कंपनीच्या बोर्डाने सीएस अभय आर गुळवणी यांची छाननीकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे.

ज्या सदस्यांनी आतापर्यंत त्यांचे ईमेल आयडी नोंदणीकृत / अपडेट केलेले नाहीत त्यांना विनंती आहे की त्यांनी कंपनीकडून इलेक्ट्रॉनिक पध्दतीने सर्व सूचना / दस्तऐवज / वार्षिक अहवाल मिळवण्यासाठी त्यांचे ईमेल आयडी नोंदणी/अपडेट करावे.

इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करण्यासह पोस्टल मतपत्रिकेशी संबंधित कोणतीही तक्रार असलेल्या कोणत्याही सदस्याला मे. Bigshare Services Pvt Ltd, कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट ईमेल आयडी : joyv@bigshareonline.com आणि फोन नंबर : ०२२-६२६३८२०० वर किंवा कंपनीला ईमेल आयडी : evoting@ugarsugar.com आणि फोन नंबर : ०८३३९-२७४000 डुप्लिकेट पोस्टल बॅलेट सूचनेसाठी. ई-व्होटिंगबद्दल कोणतीही शंका नॅशनल सिक्यूरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड, ४ था मजला, ट्रेड वर्ल्ड - ए विंग, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३, फोन नंबर : ०२२-२४९९४७३८ या क्रमांकावर किंवा evoting@nsdl.co.in वर ईमेल लिहा.

पोस्टल बॅलेटचे निकाल २६-०३-२०२४ रोजी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात घोषित केले जातील आणि कंपनीच्या वेबसाईटवर देखील प्रदर्शित केले जातील. NSDL आणि स्टॉक एक्स्चेंजना सादर केले जातील.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार,
दि उगार शुगर वर्क्स लि.
दिनांक: २२-०२-२०२४ श्री.तुषार देशपांडे
स्थळ : सांगली. कंपनी सेक्रेटरी

Nupur Ads